9/2016 Peer reviewed Impact Factor 2.46 (UIF) July 2016

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 3

# लोकगीते स्वरूप व परंपरा

**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**
कला व विज्ञान महिला महाविद्यालय
मेहकर, जि.- बुलडाणा महाराष्ट्र भारत

लोकगीते ही मानवी मनाची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे मौखिक परंपरेने लोकगीते लोकजीवनात प्रचलित असुन त्यांचा कर्ता अनामिक असतो. त्यांची निर्मिती समूहमनात होत असुन त्यांचे आवाहनही समूहामनास असते. लोकगीतांतून लोकजीवनाचे अनेक पैलू, त्यांच्या सूक्ष्म छटा सहजपणे व्यक्त होतात. लोकगीते ही नित्यनूतन स्वरूपाची असतात. लोकगीताचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. मानवी जीवनाच्या विविध अंगांना लोकगीत स्पर्श करते. मनोरंजन, विधी, श्रमपरिहार, आचरण, देवदेवतांची उपासना, भावाभिव्यक्ती, नीतिबोध, खेळ, नृत्य यांना साथ म्हणून अशा अनेक उद्दिष्टांसाठी लोकगीतांची निर्मिती झालेली असल्यामुळे त्यांच्यामध्ये विविधता आढळते. यांतून लोकगीतांची व्यापकता लक्षात येते.

लोकगीताची परंपरा फार प्राचीन आहे. वेदपूर्वकाळात लोकगीते प्रचलित असावी. वेदकालीन लोकगीतांच्या स्वरुपाचा विचार करता, विविध स्वरुपात लोकगीते त्याकाळी प्रचलित होती असे लक्षात येते. तत्कालीन लोकजीवनात प्रचलित असलेल्या अशा लोकगीतांना 'गाथा' म्हटले जाते. वेदकालानंतर पुराणकाळातही लोकगीते प्रचलित असल्याचे दिसते. महाकाव्यातही लोकगीत परंपरेचा उल्लेख आढळतो. संस्कृत वाङ्मयातही लोकगीताचे उल्लेख आढळतात. जैनचूर्णीतही लोककाव्याचा उल्लेख आहे. सातवाहन काळातही लोकगीते प्रचलित होती. लोकगीतांची ही परंपरा अनेक शतकांपासून लोकजीवनात अखंडपणे प्रचलित असल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये लोकगीताचे स्वरुप व परंपरा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**लोकगीताचे स्वरुप :-**

लोकगीतांचा अभ्यास करुन त्यांच्या स्वरुपावर प्रकाश टाकण्याचे प्रयत्न आपल्या देशात आणि पाश्चिमात्य देशातील अनेक अभ्यासकांनी केले आहेत, त्यावरुन लोकगीताचे स्वरुप लक्षात येते. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मतानुसार, विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचिले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयान पिढया आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत, होय. हे लोकगीत म्हणजे सामान्य



330

Scanned with CamScanner

माणसांच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्तीच आहे,[1] असे त्यांना वाटते. त्यांच्या मते, मौखिक परंपरेने अशिक्षितांत चालत आलेले भावगीत म्हणजे लोकगीत होय.

लोकगीतांची निर्मिती लोकसमूहात स्वाभाविकपणेच होत असते. लोकगीत म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते त्यांचे संगीतमय गीत होय. लोकगीतांच्या मौखिक परंपरेचा विचार करता त्यांची नित्यनूतनता हा विशेष प्रत्ययास येतो. मौखिक गीतांचा कर्ता हा अनामिक असतो. लोकगीतातून लोकजीवनाचे अनेक पैलू, त्याच्या सूक्ष्म छटा सहजपणे व्यक्त होतात. लोकगीतांना काळाचे बंधन नसते. ते कालातीत असतात. लोकगीतांची निर्मिती, जडणघडण आणि लोप पावणे या क्रिया अखंडपणे चालू असतात. त्यामुळे लोकगीतात नवे–जुने असे काही म्हणता येत नाही. परंपरा टिकविण्याचा प्रयत्न लोकगीतांद्वारे होत असल्यामुळे त्यातून शब्दांची प्राचीन रुपे जुन्या प्रथांचे अवशेष सतत डोकावत असतात.

मराठी लोकगीतांमध्ये स्त्रियांची तसेच पुरुषांची लोकगीते आढळतात. पुरुषांच्या गीतांमध्ये रंजनमूल्य अधिक असते. मराठी लोकसंस्कृती अनेकविध विशेषांनी नटलेली आहे. या संस्कृतीच्या उपासकांत वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, पोतराज, भराडी, डाक वाजविणारे कुंभार यांचा प्रामुख्याने समावेश होतो. या उपासकांना मराठी लोकजीवनात भगतांचे स्थान प्राप्त झालेले असते. देवदेवतांच्या उपासनाविधित या भगतांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी लोकसंस्कृतीचे हे उपासक देवदेवतांच्या उपासनाविधीप्रसंगी उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागताना गाणी म्हणतात. तसेच उदरनिर्वाहासाठी भटकंती करणारे बहुरूपी, पांगुळ, कुडमुड्या जोशी, नंदी बैलवाले इ. मौखिक परंपरेने चालत आलेली गाणी गातात.

1) **गोंधळ्याची गाणी :–** गोंधळायात साधारणतः चार ते पाच व्यक्ती असतात. गोंधळात संबळ, तुणतुण्याच्या साथीवर पुराणातील एखादी कथा पदयात्मक स्वरूपात साभिनय सादर केली जाते. गोंधळाची गाणी परंपरेने चालत आलेली असतात.

तुळजापूरची आई गोंधळा यावे

कोल्हापुरची लक्ष्मीबाई गोंधळा यावे

माहूरची रेणुका माते गोंधळा यावे

बासरच्या सरस्वती गोंधळा यावे

या गीतातून गोंधळी महाराष्ट्रातील अनेक देव–देवतांना गोंधळाला येण्याचे आवाहन करतो.



Scanned with CamScanner

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 3

2) **वासुदेवांची गाणी :–** वासुदेव हा श्रीकृष्ण भक्त असून उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागत असताना तो श्रीकृष्णविषयक व अन्य गाणी गात असतो. रचनेच्या व आकाराच्या दृष्टीने ही कथागीते मोठी असतात. या गीतातून कृष्णाच्या बाललीला, यशोदेचा वत्सल भाव, गोकुळातील गौळणीचे वर्णन रसाळ वाणीने केलेले असते. आध्यात्मिक स्वरूपाच्या गीतातून आत्मा, परमात्मा यासंदर्भात विवेचन, मानवी जीवनाचे सार्थकत्व विविध दृष्टांताच्या आधारे व्यक्त केले जाते.

3) **वाघ्या–मुरळीची गाणी :–** मराठी लोकजीवनात खंडोबा या लोकदेवतेच्या उपासनेत वाघ्या–मुरळी आणि त्यांचे जागरण यांना महत्वाचे स्थान आहे. वाघ्या–मुरळीची गाणी प्रामुख्याने जागरण प्रसंगी गातात. या गाण्यांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे मानवी भावभावनांचे आरोपण यांच्यातून केले जाते. लौकिक जीवनातील घटनाप्रसंग, खंडोबा, म्हाळसा आणि बाणाई यांच्या जीवनदर्शनातून वर्णिलेले असल्यामुळे या दैवताविषयी आणि वाघ्या–मुरळी यांच्याविषयी एक आपलेपणा समाजजीवनात पाहावयास मिळतो.

4) **पोतराजची गाणी :–** गावाचे रक्षण करणारी ग्रामदेवता म्हणून मरीआईला मराठी मुलखात श्रध्देचे स्थान असून तिचा भगत म्हणून पोतराजालाही मराठी लोकजीवनात आदराचे स्थान आहे. जागरणात पोतराजाला अनन्यसाधारण महत्व असते. कथात्म गीते, ओवीसदृश्य गीते, धूपाजीच्या कथा असे पोतराजाच्या गाण्याचे स्वरूप असते.

5) **भराडयाची गाणी :–** भैरवनाथाचे उपासक म्हणून भराडी लोकजीवनात ओळखले जातात. एक कुळाचार म्हणून 'भराड' घालण्याची प्रथा काही घराण्यात आहे. भैरवाच्या उपासनाप्रसंगी आणि इतर वेळीही भिक्षा मागताना भराडी गाणी गातात. भराडात पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असतात. पूर्वरंगात गण, भराडास येण्याचे देवदेवताना आवाहन आणि ज्योतिबाची गाणी असतात. तर उत्तररंगात कथागीत सादर केले जाते. कथागीत, विधीगीते, मंत्रात्मक स्वरुपाची गीते असे भराडयाच्या गीताचे स्वरुप असते.

6) **धनगराची गाणी :–** धनगराचे उपासना दैवत बिरोबा. बिरोबाच्या उपासनेतील 'सुंबराज' आणि 'हुईक' वैशिष्टयपूर्ण असते. बिरोबाच्या उपासनेत 'हुईकला' अनन्यसाधारण महत्व आहे. धनगराची व त्यांच्या भगताची गीते ही कथात्म गीते, बिरोबाचे माहात्म्य सांगणारी गीते, अशा स्वरुपाची आहेत. गोंधळ जागरणाप्रमाणे हुईक सुरु होताना बिरोबासह इतर देवदेवतांना हुईकास येण्याचे व हुईक निर्विघ्न पार पाडण्याचे आवाहन केले जाते 'सुंबराना' त 'गणा' त निरनिराळया देवदेवतांचे उल्लेख केले जातात.

330

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार 3P a 6



Scanned with CamScanner

7) **पांगुळाची गाणी :–** मराठी लोकसंस्कृतीच्या अनेक उपासकांपैकी पांगुळ हा एक उपासक आहे. सध्या पांगुळ सहसा पाहावयास मिळत नाही. पांगुळ ही संस्था प्राचीन असून प्रामुख्याने तिचा आढळ महाराष्ट्रात आहे. भटकंती करुन उदरनिर्वाह करणे व लोकांना धार्मिक कथा सांगणे असे त्याचे स्वरुप होते.

8) **कृषीजीवनविषयक गीते :–** ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. प्रातःकाळापासून रात्री निजेपर्यंत या लोकांचा संबंध शेतीशीच येत असतो. तेव्हा अशा लोकसमुहाच्या लोकगीतांतून कृषीजीवनाचा आविष्कार घडणे स्वाभाविक आहे. मोट हाकताना, पेरणी करताना, खुरपणी करताना, कापणी करताना खळे शिंपताना, श्रमपरिहारासाठी गीते गायिली जातात. तसेच फुरसतीच्या वेळी घरापुढील अंगणात, गावातील सार्वजनिक ठिकाणी , चावडीवर किंवा शेतातील मांडवावर समवयस्क पुरुष एकत्र आले की गाण्याच्या मैफली होतात आणि रंगू लागतात. शेतातील पीक काढताना, विशेषतः कापणीच्या वेळी शेतकरी एकत्र येऊन काम करता करता श्रमपरिहारासाठी गाणी गातात. या गीताना 'भलरी' असे म्हटले जाते. अशा गीताव्दारे विविध भावभावनांचे रंग पाहावयास मिळतात.

9) **लोककथागीते :–** मराठी लोकवाङ्मयात लोककथा व लोकगीते यांच्याप्रमाणेच लोककथागीतांचे समृध्द व संपन्न असे दालन आहे. मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित असलेले कथात्म लोकगीते म्हणजे लोककथागीत होय. डॉ.प्रभाकर मांडे लोककथागीतांचे स्वरुप स्पष्ट करताना म्हणतात. "लोककथागीते गेय असून ती मौखिक परंपरेने लोकसमूहात चालत येतात. सामूहिकता त्यांचा एक विशेष असतो. निर्मात्याच्या व्यक्तिमत्वाचा त्यात अभाव असतो. म्हणजेच ती अनामिकांची असतात. लोककथागीते साधी आणि अनलंकृत असतात."[2] आज मराठी लोकजीवनात वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी सारखे कथागीत गायक पहावयास मिळतात. लोकजीवनात कथागीते रुजविण्यास या गायकांचा मोलावा सहभाग आहे. लोककथागीत गायकांचीही परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. पुरोहित, पुराणिक, सूत अशा स्वरुपाचे गायक त्यावेळी होते. मराठी लोकथागीताचे पुढील प्रमाणे वर्ग करता येतात.

1) पौराणिक घटनांवर आधारित कथागीते

2) कौटुंबिक आणि सामाजिक कथागीते

3) भगतांची देवदेवता विषयक कथागीते

4) ओवी स्वरुपाची कथागीते



330

Scanned with CamScanner

10) **स्त्रीगीते :-** मराठी लोकगीतांमध्ये स्त्रीगीताची संख्या मोठी आहे. सासर–माहेर, कुलाचार ,विधी, विविध सणउत्सव, सुखदु:खाचे अनुभव स्त्रीला येतात. मराठी लोकगीतातील स्त्रीगीतात पुढील प्रकारची गीते आढळतात.

1) ओवीगीते

2) विधीगीते

3) फेरावरची गीते

4) खेळगीते

ओवीगीतात जात्यावरच्या ओव्या आढळतात. तर विधिगीतात लग्न, मुंज, बारसे, डोहाळे इ. प्रसंगी गायल्या जाणाऱ्या गीतांचा समावेश होतो. नागपंचमी, वटपौर्णिमा, मंगळागौरी, संक्रांत यासारख्या सणउत्सवाच्या प्रसंगी मराठी स्त्रिया जी गाणी गातात त्यांचा समावेश फेरावरच्या गीतात केला जातो. स्त्रीगीतात खेळाच्या क्रियेशी संबंधित काही गीते आहेत. त्यामध्ये फेर धरुन म्हटली जाणारी नृत्यखेळगीते, झिम्मा, पिंगा आणि झोका खेळताना म्हटल्या जाणाऱ्या गाण्याचा समावेश होतो.

**लोकगीताची परंपरा :-**

लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. मानवाच्या आदिम अवस्थेत मानव टोळया करुन राहु लागला तेव्हापासून लोकगीताचा प्रवाह अखंडपणे वाहत आलेला असावा. वेदपुराण, संस्कृत वाङमयाच्या आधारे लोकगीतांच्या परंपरेचा मागोवा घेता येतो. वेदपूर्वकाळात लोकगीते समाजजीवनात प्रचलित असावी. त्यानंतरच्या लिखित वाङमयात लोकगीताचे उल्लेख आढळतात. वेद, पुराणे, ब्राम्हणग्रंथ, बौध्द आणि जैन वाङमयातही लोकगीताचा उल्लेख आहे. यावरुन असे अनुमान काढता येईल की, या वाङमयापूर्वीही लोकगीताचे प्रचलन लोकजीवनात होते. लोकगीते ही मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होत असल्यामुळे निरनिराळया काळात त्यांच्या स्वरुपात थोडाफार फरक पडत गेला तरी त्यांची परंपरा मात्र कायम होती. मौखिक रुपाने ज्ञान जतन करुन ठेवण्याची परंपरा वेदाच्या रुपाने पाहावयास मिळते. वेद वाङमयात लोकगीतांचे अस्तित्व पाहावयास मिळते.

लोकगीताची वेदकालीन परंपरा पाहत असता ऋग्वेदातील सूक्तो मार्गदर्शक ठरतात. यज्ञविधी प्रसंगी म्हटली जाणारी सुक्तो आजच्या विधिगीतांशी नाते दर्शवितात. ऋग्वेदातील संवाद सूक्ताचाही उल्लेख कारता येईल. लोकगीते, पोवाडे, महाकाव्य आणि विधिनाटयाचे उगमस्थान म्हणजे ऋग्वेदातील संवाद सूक्त होत, असे मत विंटरनिट्स या पाश्चात्य अभ्यासकाने व्यक्त केले आहे. आज उपलब्ध



Scanned with CamScanner

झालेल्या लोकगीताचे स्वरुप पाहू जाता विंटरनिट्सचे हे मत मान्य होण्यासारखे आहे. त्यामुळे ऋग्वेदातील संवाद सुक्ते म्हणजे वेदकालीन लोकगीताचे स्वरुप होय.तत्कालीन लोकजीवनात मौखिक परंपरेने ही सूक्ते प्रचलित होती. या सूक्ताप्रमाणेच अथर्ववेदातील जारणमरण कर्मासंबंधीची सूक्तेही लोकजीवनात रूढ असल्याने दिसते. तेव्हा वेदकाळाचा विचार करता त्याकाळी लोकगीताची परंपरा अशा स्वरुपाची होती. वेदकाळातील लोकगीताचे स्वरुप निश्चित सांगता येत नसले तरी विविध स्वरुपात लोकगीते त्याकाळी प्रचलित होती हे दिसते.यज्ञविधी प्रसंगी गाणी म्हणण्याची असलेली प्रथा, विधी आचरणात गाणी गाण्याची प्रथा, पुत्र, जन्म, विवाह इ. प्रसंगी गाणी गायिली जात असत याचे उल्लेख आढळतात. तत्कालीन लोकजीवनात प्रचलित असलेल्या अशा स्वरुपाच्या गीतांना 'गाथा' म्हटले जाते. गाथा शब्दाची उत्पत्ती पाहू जाता 'गै' म्हणजे गाणे यादृष्टीने 'गाथा' शब्द रुढ झाला असावा, असे म्हणता येते. तेव्हा या गाथाचे स्वरुप लोकगीतासारखेच होते. या गाथेतून महाकाव्याच्या शैलीचा उदय झाला असावा असे मत सौ. सिंधु डांगे यांनी मांडले आहे. त्यांच्या मते, गाथा सप्तशतीमधून एक व्यक्ती वा एक प्रसंग यांना अनुसरुन मोठी कवने निर्माण झाली असावीत, याच प्रक्रियेचा परिपाक पुढे रामायण व महाभारत या दोन महाकाव्यात झालेला दिसून येतो. या रचनांच्या कितीतरी आधी यातील व्यक्तींना वा प्रसंगाना अनुसरुन कितीतरी छोटी मोठी कवने झाली असावीत. तेव्हा तत्कालीन 'गाथा' लोकगीतांशी साधर्म्य दर्शवितात. गाथांचे गायक जे बंदीजन म्हणून ओळखले जात, ज्यातून सूत परंपरा उदयास आली. त्यातच परंपरेशीच लोकगीत गायकांची परंपराही निगडीत असावी असे दिसते.

लोकगीत परंपरेचा मागोवा घेतल्यास वेदकाळानंतर पुराणकाळातही लोकजीवनात लोकगीते प्रचलित असल्याचे निदर्शनास येते. महाकाव्यात लोकगीत परंपरेचा उल्लेख आढळतो. रामायणाची रचनाच मुळी त्या काळी प्रचलित असलेल्या लोकगाथेच्या आधारावर झाली आहे. तत्कालीन लोकगीत परंपरेचा शोध घेताना रामायण या महाकाव्यातील रामजन्मप्रसंगी म्हटल्या गेलेल्या गीतांचा विचार बरेच काही या संदर्भात सांगून जातो. पुराणे, महाकाव्ये यांच्या आधारे लोकगीत परंपरेचा शोध घेऊन त्या–त्या पूर्वकाळात आपणास जाता येते. संस्कृत वाङ्मयातही लोकगीतांचे उल्लेख आढळतात. संस्कृत वाङ्मयाप्रमाणेच जातककथाही या परंपरेत मार्गदर्शक ठरतात. थोडक्यात म्हणजे वेदवाङ्मय पुराणे, महाकाव्ये आणि संस्कृत वाङ्मय इत्यादींच्या आधारे लोकगीतांच्या परंपरेचा मागोवा घेता आपल्याला वेदपूर्वकाळापर्यंत जाता येते.

यानंतर सातवाहनाच्या गाथा सप्तशतीत लोकगीतांचे उल्लेख आलेले दिसतात. त्यामध्ये लोकजीवनाच्या अनेक विशेषांची नोंद करण्यात आलेली आहे. नंतरच्या काळात लोकगीतांचे प्रचलन अधिक झालेले दिसते. आता लोकगीते विविध स्वरुपात आढळतात. आज उपलब्ध असलेल्या ओवीलोकगीतांत स्त्रीगीतांची संख्या विपुल आहे. अशा स्त्रीगीतातील ओवीगीतांचा उल्लेख सहाव्या



330

Scanned with CamScanner

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 3

शतकांपासून झालेला आढळतो. ओवीगीतांचा आणि दळणकांडण यांचा असलेला संबंध जैनांच्या बृहत्कल्प सूत्र भाषांमध्ये आलेला आहे. तसेच यादवकाळात स्त्रिया दळणकांडण करताना ओव्या म्हणत असत, असे उल्लेख आढळतात. लोकगीतांची ही परंपरा अनेक शतकांपासून लोकजीवनात अखंडपणे प्रचलित असल्याचे दिसते. लोकगीते मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येत असल्यामुळे इतर वाङ्मयातील त्यांच्या उल्लेखावरुन या परंपरेचा त्या त्या काळातील मागोवा घेता येतो.

समारोपः

लोकगीते लोकजीवनात प्रचलित असून, त्याचा कर्ता हा अनामिक असतो.मराठी लोकगीतांमध्ये स्त्रियांची तसेच पुरुषांची लोकगीते आढळतात. मराठी लोकसंस्कृतीचे उपासक वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, पोतराज, भराडी, डाक वाजविणारे कुंभार यांच्या गीतांना समावेश लोकगीतामध्ये होतो.तसेच उदरनिर्वाहासाठी भटकंती करणारे बहुरूपी, पांगुळ, कुडमुडे जोशी, नंदीबैलवाले यांच्या मौखिक परंपरेने चालत आलेल्या गीतांनाही एक महत्वाचे स्थान लोकगीतामध्ये आहे. या लोकगीतांवरुन लोकजीवनाची, लोकसंस्कृतीची कल्पना येते. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. कृषीकर्म करताना श्रमपरिहारासाठी तसेच फुरसतीच्या वेळी गाणी गायिली जातात. अशा गीतांव्दारे विविध भावभावनांचे रंग पाहावयास मिळतात. मराठी लोकगीतामध्ये स्त्रीगीतांची संख्याही मोठी आहे. ओवीगाणे, विधीगीते, फेरावरची गीते, खेळगीते अशी विविध स्वरुपाची स्त्रीगीते आढळतात. लोकगीते ही मानवसंस्कृतीच्या दृष्टीनेही महत्वाची असतात. मानवी जीवनातील सुखदुःखाचा आविष्कार लोकगीतात झालेला आढळतो. आदिम जीवनाचे अवशेष लोकगीतात पाहावयास मिळतात. ती आपल्या जीवनविकासाच्या इतिहासाची नोंद करुन ठेवतात. आणि लोकजीवन, लोकसंस्कृती, रीतीरिवाज, रुढी, प्रथा, आचारविचार इ. चे दर्शन आपणास लोकगीतांव्दारे घडते. लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. वेदवाङ्मय, पुराणे, महाकाव्ये आणि संस्कृत वाङ्मयातही लोकगीते आढळतात. त्याच्या आधारे लोकगीतांचा मागोवा घेतल्यास वेदपूर्वकाळापर्यंत जाता येते. सातवाहनाच्या गाथा सप्तशतीत लोकगीतांचे उल्लेख आढळतात. यावरुन लोकगीतांची ही परंपरा अनेक शतकांपासून लोकजीवनात अखंडपणे प्रचलित असल्याचे दिसते.

## संदर्भ टिपा

1 डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. शरद व्यवहारे, मराठी लोकगीत: स्वरुप विशेष, पृ. क्र. 1 वरुन उद्धृत.

2 डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरुप पृ. क्र. 266

Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार